<u>प्रेसनोट</u> दिनांक १३/१०/२०२१

**भिवंडी शहर निजामपुर शहर महानगरपालिकाचे स्विकृत नगरसेवक सिध्देश्वर मोगलप्पा कामुर्ती यांना दुकानदाराकडुन लाच घेतांना ला.प्र.वि.ठाणे विभागाकडुन ताब्यात घेतले बाबत.**

| क्र | घटक | ला.प्र.वि.ठाणे |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | भिवंडी शहर पोलीस ठाणे, ठाणे शहर |
| २ | लोकसेवकांचे नाव व कार्यालय | सिध्देश्वर मोगलप्पा कामुर्ती, वय ६२ वर्ष, स्विकृत नगरसेवक भिवंडी शहर निजामपुर शहर महानगरपालिका |
| ३ | मागीतलेली लाचेची रक्कम | २,००,००,००० (दोन कोटी रुपये) तडजोड अंती ५०,००,००० (पन्नास लाख)/— रू |
| ४ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,००,००० (पन्नास लाख)/— रू |
| ५ | थोडक्यात हकीगत | तक्रारदार यांचे पद्मानगर भाजी मार्केट भिवंडी येथे दुकान असुन, तेथील सुमारे १०० दुकाने आहेत. सदर दुकाने अनाधिकृत असुन ती तोडण्याबाबत लोकसेवक श्री.कामुर्ती यांनी भिवंडी. निजामपुर शहर महानगरपालिका येथे अर्ज केला होता. सदर अर्ज मागे घेण्याकरिता तक्रारदार यांचेकडे २ करोड रुपयाची मागणी केली होती, तक्रारदार यांना आरोपीत लोकसेवक यांना २ करोड रूपये देण्याची अजिबात इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक ३०/०९/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, ठाणे येथे येवुन लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/१०/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी मध्ये आरोपीत लोकसेवक यांनी तडजोड अंती पन्नास लाख रुपयाची लाचेची मागणी केल्याचे निषन्न झाल्याने, दिनांक १३/१०/२०२१ रोजी आरोपीत लोकसेवक यांचे विरुध्द सापळा कारवाई करुन त्यास तक्रारदार यांचेकडुन ५०,००,०००/—रु (पन्नास लाख रुपये) लाच घेताना पकडण्यात आले आहे. |

मार्गदर्शन अधिकारी :— मा.डॉ.पंजाबराव उगले सो, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.ठाणे परिक्षेत्र,ठाणे

ला.प्र.वि.ठाणे विभागामार्फत नागरीकांना आव्हांन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका विरूध्द तक्रार असल्यास ला.प्र.वि.ठाणे परिक्षेत्र,ठाणे कार्यालय यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्काचा पत्ता :— ला.प्र.वि.ठाणे कार्यालय, मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थंळ :— acbmaharashtra@ mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net
टोल फ्री नं.:— १०६४
दूरध्वनी क्रं. :— ०२२/२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्सप तक्रार क्र :— ९९३०९९७७००

( माया एच.मोरे )
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,ठाणे